नि.दि.दा. क्र. ५७/२०२१
प्रेमदास वि. फुलसिंग
निशाणी क्र. १८.

नावः – राजेंद्रकुमार नानाभाऊ बावसकर,
वयः – ५२ वर्ष,
धंदाः – नोकरी– उप अधिक्षक भुमी अभिलेख, बदनापुर,
राहणारः– बदनापुर, ता. बदनापुर, जि. जालना

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा सरतपास विधीज्ञ श्री.एम.आर.देशपांडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

मी गेल्या २६ वर्षांपासुन भुमी अभिलेख विभागात नोकरी करतो. तसेच गेल्या १५ वर्षांपासुन निमतानदार म्हणुन कार्यरत आहे. मी बदनापुर येथील कार्यालयात सन २०२१ पासुन कार्यरत आहे. माझे निमतानदारचे प्रशिक्षण झाले आहे. मला दावा मिळकतीच्या मोजणीचे आदेश कार्यालयाकडुन प्राप्त झाले. मी मोजणीची संपुर्ण संचिका आज रोजी सोबत आणली आहे. मला आदेश प्राप्त झाल्यानंतर मी वादी व प्रतिवादी यांना मोजणीचे नोटीस काढल्या होत्या. त्यानुसार दि.२५.०७.२०२३ रोजी मोजणीची तारीख ठरविली होती व त्याच दिवशी मोजणी केली. मोजणी करतांना जुने अभिलेख मी सोबत नेले होते. जाय मोक्यावर मी इ.टी.एस.मशिनद्वारे मोजणी केली. मला वाद मिळकतीच्या सर्वे नंबरच्या कायम खुना मिळुन आल्या. मोजणी नकाशाची अ प्रत मुळ संचिकेत समाविष्ट आहे ती मी आज सोबत आणली आहे. अ प्रति प्रमाणे आम्ही ब व क प्रत तयार करतो व क प्रत न्यायालयात पाठवितो. आता मला क प्रत दाखविण्यात आली. ती अ प्रत प्रमाणेच आहे. ती खरी व बरोबर आहे त्यावर मोजणी करणार म्हणुन माझी सही आहे. तसेच परिनीरिक्षण करणार म्हणुन आमच्या कार्यालयाचे छाननी लिपीक व्ही.बी.राऊत यांची तसेच शिरस्तेदार म्हणुन डी.जी.म्हस्के यांची सही आहे. मी सर्व सहया ओळखतो. नकाशाला

**<u>निशाणी क्र. १९</u>** देण्यात येते.

मी मा. न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या अभिलेखाप्रमाणे व प्रत्यक्ष कब्जात असलेले क्षेत्र मोजणी करुन वेगवेगळया रंगाने दर्शविले. त्याचे विवरण क प्रत मध्ये नमुद केले आहे.

सदर मोजणीमध्ये वादी याच्या ताब्यातील क्षेत्र हे पिवळया रंगाने दर्शविले असुन वादी यांचे अभिलेखाप्रमाणे ७/१२ पत्रकी १ हे ४४ आर जमीन असुन प्रत्यक्ष ताब्यात ७४ आर जमीन आढळुन आली.

तसेच मोजणी नकाशामध्ये भगव्या रंगाने दर्शविलेली जमीन वादींच्या कब्जात असुन तिचे क्षेत्र ११ आर आहे. त्यातिल ७ आर क्षेत्र हे लगत धारक तेजराव परशराम राठोड यांच्या ताब्यात ७/१२ प्रमाणे असणे आपेक्षीत आहे. ते हिरव्या रंगाने दर्शविले आहे.

तसेच मोजणी नकाशामध्ये आकाशी रंगाने दर्शविलेली जमीन क्षेत्र १३ आर ही अधिकार अभिलेख ७/१२ प्रमाणे वादी यांना मिळणे आपेक्षीत आहे जी लगत धारक काकासाहेब व ईतर यांच्या कब्जात आहे.

सदर मोजणीमध्ये वादीसह इतर सहधारक यांचा देखील विचार करुन मोजणी केली आहे. वाद जमीनीमध्ये वादी यांच्या मालकीचे ५३ आर क्षेत्र कमी भरते. ते फुलसिंग भाऊराव राठोड यांच्या वहितीस आहे. फुलसिंग राठोड यांचे ताब्यात अभिलेखावर नमुद क्षेत्रापेक्षा ५३ आर क्षेत्र जास्त आहे जे गुलाबी रंगाने नकाशात दर्शविले आहे.

मी सदर मोजणी केल्यानंतर मोजणीचा पंचनामा केला होता. मुळ पंचनामा मी आज रोजी सोबत आणला आहे. आता मला त्या पंचनाम्याची सत्य प्रत

दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यातिल मजकुर बरोबर आहे. त्यावर पंच म्हणुन १ ते ८ व वादी यांची व माझी समक्ष म्हणुन सही आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र. २०** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादी यांच्याविरुद्ध दावा एकतर्फा चालल्याने उलटतपास नाही.**

स्वा/-

दि.१८.१२.२०२५

(श्री. जी.एन. लंघे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.